**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत उपजिल्हा कार्यक्रम समन्वयकांची** (Deputy District Program Coordinator) १२ <u>पदांना मुदतवाढ देणेबाबत.</u>
**दिनांक ३१.७.२०१५ ते ३१.७.२०१८**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः आस्थाप २०१३/प्र.क्र.२११/मग्रारो-३**
नवीन प्रशासकीय इमारत, १६ वा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीखः २२ जानेवारी, २०१६.

<u>वाचा</u>

शासन निर्णय क्रमांकः आस्थाप-२०१३/प्र.क्र. २११/मग्रारो-३, दिनांक ३०.७.२०१४.

<u>प्रस्तावना</u>

राज्यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मोठया प्रमाणात कामाची मागणी असलेल्या व कामे सुरु असलेल्या तसेच जास्तीत जास्त मजूर उपस्थिती असलेल्या गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, यवतमाळ, नंदूरबार, अहमदनगर, नांदेड, औरंगाबाद, पालघर व उस्मानाबाद अशा एकूण १२ जिल्हयांमध्ये उप मुख्य कार्यकारी अधिकारी, गट-अ या संवर्गातील "उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक" या पदनामाची एकूण १२ अस्थायी पदे तदर्थ तत्वावर प्रथमतः १ वर्षासाठी प्रायोगिक तत्वावर निर्माण करण्यास मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक १८.६.२०१४ च्या ८२ व्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुसार संदर्भाधीन दिनांक ३०.७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये उप मुख्य कार्यकारी अधिकारी गट-अ संवर्गातील १२ पदे उक्त १२ जिल्हयांमध्ये निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली.

सदर पदे दिनांक ३०.७.२०१५ च्या पुढे कार्यरत ठेवणे आवश्यक असल्याचे आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर यांनी अभिप्राय दिले. तसेच मा. पंतप्रधानांकडून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील मजुरांची मजूरी आधार आधारित प्रणालीव्दारे अदा करण्याबाबतचा आढावा/ प्रगती व्हिडिओ कॉन्फरन्सव्दारे वेळोवेळी घेण्यात येत आहे. त्यामध्ये आधार सिडींग व त्यांची मजूरी आधार लिंक्ड बँक खात्यात करणे अभिप्रेत आहे. गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, यवतमाळ, नंदूरबार, अहमदनगर, नांदेड, औरंगाबाद, पालघर व उस्मानाबाद अशा एकूण १२ जिल्हयांमध्ये उप मुख्य कार्यकारी अधिकारी, गट-अ या संवर्गातील "उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक" या पदनामाची एकूण १२ अस्थायी पदे निर्माण केल्याने मजुरांच्या उपस्थितीत वाढ झालेली आहे. त्यामुळे सदर १२ पदांना दिनांक ३०.७.२०१५ च्या पुढे मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक ४.१.२०१६ च्या ९७ व्या बैठकीत मांडण्यात आला. उच्चस्तरीय समितीने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत उप मुख्य कार्यकारी अधिकारी या संवर्गातील उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक यांच्या १२ पदांना दिनांक ३०.७.२०१५ पासून ३ वर्षासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता दिली

आहे. त्या अनुषंगाने सदर पदांना दिनांक ३०.७.२०१५ च्या पुढे ३ वर्ष मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत राज्यामध्ये मोठया प्रमाणात कामाची मागणी असलेल्या व कामे सुरु असलेल्या तसेच जास्तीत जास्त मजूर उपस्थिती आहे अशा गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, यवतमाळ, नंदूरबार, अहमदनगर, नांदेड, औरंगाबाद, पालघर व उस्मानाबाद या १२ जिल्हयांमध्ये उप मुख्य कार्यकारी अधिकारी गट-अ या संवर्गातील १२ पदांना दिनांक ३०.७.२०१५ पासून पुढे दिनांक ३१.७.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यास या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.
- यापूर्वी विभागाच्या संदर्भाधीन दिनांक ३०.७.२०१४ च्या शासन आदेशातील सर्व तरतूदी सदर पदांना लागू राहतील.
- **यावरील होणारा खर्च केंद्र शासनाकडून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीपैकी प्रशासकीय खर्चासाठी अनुज्ञेय असलेल्या ६% निधीतून संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालयांकडून भागविण्यात येईल.**
- सदर पदांची उपयोगिता लक्षात घेऊन, योजनेसाठी ३ वर्षानंतर पदांची आवश्यकता असल्यास त्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर यांनी पदांची मुदत संपण्यापूर्वी किमान ६ महिने आधी शासनास सादर करणे आवश्यक राहिल.

सदर आदेश तात्काळ अंमलात येतील. या आदेशामुळे मुदतवाढ देण्यात आलेल्या उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (Deputy District Program Coordinator) या पदावरील उप मुख्य कार्यकारी अधिकारी संवर्गातील अधिका-यांच्या नियुक्त्या ग्राम विकास व जलसंधारण विभागाने / विभाग प्रमुखांनी येथून पुढेही कराव्यात

सदर आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक : २/विसु-१, दिनांक २.१.२०१६ अन्वये व उच्चस्तरीय सचिव समितीने दिनांक ४.१.२०१६ च्या बैठक क्रमांक ९७ मध्ये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२११५४४३१९७१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pramod Sopan Shinde

Digitally signed by Pramod Sopan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=State Cordinator SBM-G, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Pramod Sopan Shinde
Date: 2016.01.22 14:54:12 +05'30'

**( प्रमोद शिंदे )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३. प्रधान सचिव (ग्रा.वि. व पं.रा.), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
४. प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
५. सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
६. सचिव (वि.सु.), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
७. सचिव (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
८. सर्व विभागीय आयुक्त.
९. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व उपनगर वगळून)
१०. सर्व उप आयुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय.
११. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१२. सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय (मुंबई शहर व उपनगर वगळून).
१३. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
१४. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
१५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
१६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
१७. सर्व उप सचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी (रोहयो प्रभाग), मंत्रालय, मुंबई - ३२.
१८. सारसंग्रहासाठी, मग्रारो-१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
१९. निवडनस्ती, मग्रारो-३, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.